REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.


'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २० जुलै, १९३८ अंक २९


# किर्लोस्कर



**२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.**

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

## हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा

**किर्लोस्कर बंधु, लि. : किर्लोस्करवाडी, सातारा**




*For All Medicinal Requisites*

— TRY —

**N. MAHADEV & Co.**

DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS

City Post Office Corner POONA, 2.

# विविध माहिती

### बँकांच्या सुटीमुळें नुकसान

ग्रेट ब्रिटनमधील बँका एक दिवस बंद राहिल्या, तर त्या देशाचें एकूण १०½ कोटि रुपये नुकसान होतें, असा एका लेखकानें अंदाज प्रसिद्ध केला आहे.

### इंपीरियल बँक ऑफ इंडिया

इंपीरियल बँकेस, ३० जून असेर पुऱ्या झालेल्या सहामाहींत, ३९ लक्ष, ५२ हजार रुपये निव्वळ नफा झाला. गेल्या वर्षातून चालू हिशेबांत ओढलेले ३० लक्ष, ४२ हजार रुपये त्यांत मिळविले म्हणजे एकूण ६९ लक्ष ९३ हजार रुपये होतात. त्यांतून १२ टक्के दरानें करमाफ डिव्हिडंड देण्याकडे ३३ लक्ष, ७५ हजार रुपयांचा विनियोग करण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें आहे. ३० लक्ष, ४९ हजार रुपये पुढील हिशेबांत ओढले आहेत.

### रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डाची सभा

रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डाची सभा मद्रास येथें भरली होती, त्यावेळीं मद्रास येथील बँकिंगमध्यें नुकतीच उडालेली खळबळ, शेतीच्या मालाचे तारणावर आधारलेल्या हुंड्या डिस्कौंट करण्यास यावयाच्या विशेष सवलती, इत्यादि विषयांवर चर्चा झाली.

### बँक ऑफ बरोडा, लि.

वरील बँकेच्या डायरेक्टरांनीं ३० जून असेरच्या सहामाहीचें १० टक्के दराचें करमाफ डिव्हिडंड जाहीर केलें आहे. बँकेस ३ लक्ष रुपये ( मागील ६८½ हजारांची बाकी धरून ) नफा झाला.

### चेक्सची देवघेव

जुलै, ता. ८ रोजीं संपलेल्या आठवड्यांत मुंबई बँकर्स क्लिअरिंग हौसमध्यें १६½ कोटि रुपये किंमतीच्या ९९,००५ चेक्सची देवघेव झाली.

### सेंट्रल एक्सचेंज बँक ऑफ इंडिया

सेंट्रल बँक ऑफ इंडियानें " सेंट्रल एक्सचेंज बँक ऑफ इंडिया " ह्या नांवानें लंडन येथें एक्सचेंज बँक नुकतीच स्थापन केली होती. ह्या बँकेकडील काम आतां बारक्लेज बँक ह्या ब्रिटिश बँकेकडे सोपविण्यांत आलें आहे.

### मुंबई येथें सिगारेट्सचा नवीन कारखाना

मेसर्स ए. ॲन्ड जे. ग्रीन लि. हे लंडन येथील सिगारेट कारखानदार मुंबई येथें सिगारेट्सचा कारखाना काढणार आहेत. कंपनीचे एक डायरेक्टर, मि. फाइनगोल्ड, हे मुंबईंत दाखल झाले आहेत. ह्या नवीन कारखान्यांत हिंदी भांडवल, हिंदी कारागीर आणि हिंदी तंबाखू ह्यांस प्राधान्य देण्याचा कंपनीचा विचार असल्याचें मि. फाइनगोल्ड ह्यांनीं सांगितलें.

### सिगारेटवरील कागद अनावश्यक ?

सिगारेटमधील तंबाखूची नालिका कागदानें वेष्टित असते. ह्या कागदाऐवजी तंबाखूचाच एक पातळ, पारदर्शक पदार्थ वापरतां येईल, असें बुडापेस्ट येथील दोघा संशोधकांचें म्हणणें आहे. ह्या शोधाचे हक्क विकत घेण्यासाठी एका अमेरिकन कंपनीनें त्यांस २५ लक्ष रुपये रोख व ५ टक्क्यांची भागीदारी देऊं केली आहे. सिगारेटवरील पांढरा कागद कलेच्या दृष्टीनें युक्त नाहीं; तो काढून टाकल्यास धूम्रपानाची मधुरता वाढेल, अशी ह्या संशोधकांची विचारसरणी आहे.

### खानेसुमारीची तयारी

येत्या दशवार्षिक खानेसुमारीची पूर्वतयारी हिंदुस्थान सरकारनें चालू केली आहे. गेल्या खानेसुमारीस अर्धा कोटि रुपये खर्च आला होता.

### कोळशापासून रंग

दगडी कोळशापासून निरनिराळ्या छटांचे सुमारें १२०० रंग तयार करतां येतात.

### १½ पौंड कोळसा=१ युनिट वीज

एक युनिट वीज निर्माण करण्यास दीड पौंड दगडी कोळसा लागतो.

### ग्रेटब्रिटनमधील धनाढ्य लोक

गेल्या वर्षी ग्रेटब्रिटनमधील ८६० लोकांचें वार्षिक उत्पन्न प्रत्येकी चार लक्ष रुपयांपेक्षा ज्यास्त होतें.

### विमानांच्या वेगांत वाढ

१९१९ सालीं इंग्लंड ते हिंदुस्थान हा प्रवास विमानानें प्रथम केला, त्यास एक महिना लागला. इंपीरिअल एअरवेजच्या पहिल्या विमानानें १९२९ सालीं हें अंतर सात दिवसांत तोडलें. आतां अडीच दिवसांत हा प्रवास पुरा होतो.

### दारुबंदीच्या अंमलास प्रारंभ

२० जुलै, १९३८ च्या रात्रीं १२ वाजतां अहमदाबाद शहरांत दारूबंदी अंमलांत येण्यास प्रारंभ होईल. अहमदाबाद कॅन्टोनमेंट आणि अहमदाबादेच्या आजूबाजूचीं २७ खेडीं ह्यांतहि दारूस बंदी व्हावयाची आहे.

### टारिफ बोर्डाचा रिपोर्ट

कागदाच्या धंद्यास संरक्षण किती चालू ठेवावें, ह्या विषयीचा आपला रिपोर्ट टारिफ बोर्डानें सरकारास सादर केला आहे. कागदाच्या आयातीवर बसविण्यांत आलेल्या संरक्षक जकातीवरील सरचार्ज काढून टाकावा, अशी सूचना बोर्डानें आधीच केली होती आणि त्याप्रमाणें सरकारनें हुकूमहि सोडले आहेत.

### पोस्टमनांची चढउतार

शहरांतील उंच इमारतींचे मजले चढून टपाल वाटतांना पोस्टमनला किती त्रास पडतो, हें मोजण्याचे प्रयोग लंडन येथें चालू आहेत. पोस्टमनच्या फुप्फुसांतून बाहेर पडणारी हवा जमा करून त्यानें काम करीत असतांना किती ऑक्सिजनचा उपयोग केला हें मापण्याचे सदरहू प्रयोग लंडन स्कूल ऑफ हायजीनच्या डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रियल सायकॉलजीनें चालविले आहेत. मुंबई शहरांतील पोस्टमनांस अशीच चढउतार करावी लागते, त्याकडे कोण लक्ष पुरवणार ?

### गव्हर्नरच्या पगारांत कपात

बिहारप्रांताच्या कपात-कमिटीनें, गव्हर्नर आणि हायकोर्टाचे न्यायाधीश ह्यांचे पगार कमी करावेत, असें सुचविलें आहे. ह्या अधिकाऱ्यांच्या पगारांत कपात करणारी दुरुस्त ऑर्डर इन कौन्सिल पार्लमेंटांत मांडण्याविषयीं कमिटीनें भारतमंत्र्यांस सुचविलें आहे, असें समजतें.

### रत्नागिरींत टेलिफोन

रत्नागिरी शहर टेलिफोननें इतर शहरांशीं जोडण्याचें काम चालू आहे, तें येत्या महिन्यांत पुरें होऊन दळणवळणास प्रारंभ होईल.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | रुपये किंमत |
|---|---|
| ३–७–३८ ते ९–७–३८ | ३६,५६,७५४ |
| १०–७–३८ ते १६–७–३८ | ७५,६१,४९४ |
| २१–९–३१ ते १६–७–३८ | ३,१६,७७,६८,७२२ |

अनुक्रमणिका


पृष्ठ

१ विविध माहिती ... ३५०

२ अर्थशास्त्र का स्वार्थ-त्याग ? ... ... ३५१

३ घसरलेला रुपया कसा सावरणार? ... ... ३५२

४ स्फुट विचार... ... ३५३

संहकारी कायद्याची चर्चा—शेतसान्यांच्या कर्जाचें निवारण—स्तुत्य उपक्रम—व्यापार घटत चालला—उपाय काय ?

५ ग्रामोद्योगाला सरकारकडून मिळालेली मदत ... ३५५

६ कपाशीचें उत्पादन आणि उठाव ... ... ३५५

७ व्यापार आणि जकाती ३५६

८ सोलापुरांत अभ्यास मंडळाची स्थापना ... ३५६

९ सहकारी चळवळ ... ३५७

१० पैसे कोणास द्यावे ? ... ३५८

११ डेक्कन मर्चंट्स असोसिएशन ... ३५८

१२ निवडक बाजारभाव... ३५९


# अर्थ

बुधवार, ता. २० जुलै, १९३८

## अर्थशास्त्र का स्वार्थशास्त्र ?

### (१)

सोलापूरच्या लिबरल असोसिएशनच्या विद्यमानें प्रो. काळे ह्यांचें रिपन हॉलमध्यें गेल्या आठवड्यांत व्याख्यान झालें. त्यांत वक्त्यांनीं हिंदी उद्योगधंदे आणि संरक्षणात्मक धोरण ह्या विषयाचें उपपत्ति आणि व्यवहार ह्यांच्या दृष्टीनें विस्तृत विवेचन केलें. "जिन्नस कोणत्याहि देशांत तयार झालेला असो, तो स्वदेशी मालापेक्षा स्वस्त असेल तर अवश्य विकत घ्यावा; ज्या धंद्यांत आपली विशेष अनुकूल परिस्थिति असेल तोच धंदा प्रत्येक व्यक्तीनें व देशानें करावा आणि इतर धंदे ह्याच तत्त्वावर दुसऱ्या व्यक्तींनीं व देशांनीं करून परस्परांत व्यापार-विनिमय व्हावा; सरकारनें धंदे व व्यापार ह्या विषयीं व्यक्तीस पूर्ण स्वातंत्र्य देऊन देशादेशांत श्रमविभागानुसार अनियंत्रित रीतीनें विनिमय होण्याचे मार्गांत कोणताहि अडथळा आणूं नये" ह्या प्रकारच्या विचारसरणीवर परंपरागत अर्थशास्त्राचा खुल्या व्यापाराचा सिद्धांत आधारलेला आहे. राज्यकर्त्यांच्या ढवळाढवळीमुळें आर्थिक व्यवहारांच्या फायदेशीर क्रमांत व्यत्यय उत्पन्न होऊन त्यांस अनिष्ट वळण लागतें, स्वस्त मालाच्या ऐवजी महाग माल लोक काढतात आणि आंतरराष्ट्रीय व्यापारापासून होणाऱ्या हितास समाज मुकतो, हा त्याच सिद्धांतास अनुसरून औद्योगिक संरक्षणाच्या धोरणाच्या केलेल्या निषेधाचा आधार होय. अर्थशास्त्राची ह्या आशयाची विचारसरणी जर बरोबर असेल तर हिंदुस्थानांतील स्वदेशी चळवळ अशास्त्रीय म्हणून त्याज्य समजावी लागेल असा विषयप्रवेश करून प्रो. काळे ह्यांनीं इंग्लंडसारख्या देशांतहि अलीकडे उद्योगधंद्यांस संरक्षण कसें व कां देण्यांत येत आहे ह्याची माहिती दिली आणि ह्या देशांत जकातींच्या संरक्षणास प्रारंभ कसा झाला आणि त्याचा हिंदी राष्ट्रास किती उपयोग झाला आहे, ह्याचें वर्णन केलें.

जुन्या परंपरेच्या अर्थशास्त्रज्ञांनीं तात्विक विवेचनांत गृहीत धरलेल्या गोष्टी अस्तित्वांत नसतील तर त्यांनीं काढलेलीं अनुमानें आणि त्यांवर बसवलेले व्यवहारिक सिद्धांत चुकीचे ठरणें अपरिहार्य आहे. कांहीं व्यक्तींचें हित म्हणजे सबंध राष्ट्राचें हित हें समीकरण व्यवहारांत खरें ठरत नाहीं. स्वस्त परदेशी माल घेतल्यानें होणारी पैशाची आणि श्रमाची बचत दुसऱ्या स्वदेशी व्यवसायांत फायदेशीर रीतीनें उपयोगांत आणतां येतेच असें नाहीं. परदेशी मालाच्या स्पर्धेमुळें स्वदेशी उद्योगधंदे मागें पडले किंवा बुडाले तर त्यांच्या जागीं नवीनें धंदे स्थापतां येतातच असेंहि नाहीं. एका धंद्यांत गुंतलेलें भांडवल आणि कामगार हे दुसऱ्या धंद्यांत जाणें ही गोष्ट वाटते इतकी सोपी नाहीं. जास्त नफा किंवा मजुरी पृथ्वीच्या ज्या भागांत मिळण्यासारखी असेल तेथें भांडवल आणि कामगार ह्यांत जातां येतें ही समजूत अनुभवानें खोटी ठरविली आहे. कित्येक धंदे फायदेशीर नसले तरी राष्ट्रसंरक्षणार्थ जगवावे लागतात असा सार्वत्रिक अनुभव आहे. स्वदेशी उद्योगधंद्यांस दिलेल्या उत्तेजनामुळें एका बाजूनें होणारें नुकसान दुसऱ्या बाजूनें भरून निघतें आणि वर राष्ट्रीय हिताचा वाढावाहि निघणें शक्य असतें. हे मुद्दे प्रो. काळे ह्यांनीं पुढें मांडले आणि इंग्लंड व हिंदुस्थान ह्या देशांतील घडामोडींचे दाखले देऊन अनियंत्रित विनिमयाच्या सिद्धांतास किती अपवाद आहेत, ह्याचें दिग्दर्शन केलें.

इंग्लंडच्या परिस्थितीस वैयक्तिक आर्थिक स्वातंत्र्याचें धोरण गेल्या शतकांत जुळण्यासारखें असल्यानें त्याचा बोलबाला झाला आणि त्यावर अर्थशास्त्राच्या एका महत्त्वाच्या सिद्धांताचा डोलारा उभारण्यांत आला. परंतु परिस्थिति-भिन्नत्वामुळें जर्मनीसारख्या देशांत तें धोरण लागू होण्यासारखें नसल्यानें तेथें निराळें अर्थशास्त्रीय विचार-प्रवाह वाहूं लागले. जर्मनींत लिस्ट ह्या नांवाच्या लेखकानें "राष्ट्रीय अर्थशास्त्र" निर्माण करून प्रत्येक देशांत विशिष्ट परिस्थितीप्रमाणें स्थानिक उद्योगधंद्यांस जकातींचें संरक्षण देणें आवश्यक असून अनियंत्रित व्यापाराचें तत्त्व मागसलेल्या राष्ट्रांस हानिकारक ठरतें हा सिद्धांत पुढें मांडला. राष्ट्रीय स्वातंत्र्य व उन्नति ह्या विषयींच्या ध्येयानें प्रेरित झालेल्या लोकांनीं ही विचारसरणी पत्करून औद्योगिक संरक्षणाचें धोरण आचरणांत आणलें. हिंदुस्थानांत ब्रिटिश राजकीय सत्तेखालीं स्वदेशी उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळण्याचें बाजूस राहून उलट खुल्या व्यापाराच्या धोरणामुळें त्यांची पीछेहाट झाली. विशेषतः महाराष्ट्रांत वर वर्णिलेल्या नव्या अर्थशास्त्राचा पुरस्कार न्यायमूर्ती रानडे ह्यांनीं विद्वत्तापूर्ण प्रकारानें प्रथम सुमारें पन्नास वर्षांमागें केला. पुण्यास सार्वजनिक काकांनीं स्वदेशीचा उपक्रम केला होता, पण न्यायमूर्तींनीं त्या चळवळीस शास्त्रीय आधार पुरवून आणि "भारतीय अर्थशास्त्र" निर्माण करून तिला जोराची चालना दिली. त्यांच्या प्रेरणेनें स्वदेशी प्रदर्शनें आणि परिषदा भरूं लागल्या. तथापि, सरकारचें धोरण अनियंत्रित व्यापाराच्या तत्वास चिकटून राहिलें. हें धोरण ब्रिटिशांच्या आर्थिक परिस्थितीस सोयीचें होतें परंतु हिंदुस्थानच्या गरजा आणि सुशिक्षित लोकमत ह्यांशीं तें विसंगत होतें. सरकारचा विरोध आणि बेफिकीरपणाची वृत्ति पाहून औद्योगिक संरक्षणाचें कार्य लोकांनीं स्वतःच्या अंगावर घेतलें. हिंदी स्वदेशी चळवळीचा उगम आणि विस्तार जनतेच्या स्वावलंबनानें व स्वार्थत्यागानें झालेला आहे.

---

## घसरलेला रुपया कसा सावरणार?

(२)

रुपयाचा ब्रिटिश चलनांतला ( स्टर्लिंग ) १८ पेन्सांचा दर टिकावयाचा असेल तर हिंदुस्थानचा निर्गत व्यापार वाढला पाहिजे किंवा आयात व्यापार घटला पाहिजे किंवा या दोन्ही गोष्टी एकाच वेळीं घडल्या पाहिजेत. आर्थिक मंदीची छाया पुन्हां दाट होऊन बाजारभाव उतरल्यामुळें आणि तसेंच सोन्याची निर्गत ह्या देशामधून कमी कमी होत असल्याकारणानें निर्गतीची किंमत वाढेल असा रंग दिसत नाहीं. आयात पुष्कळ अंशांनीं आर्थिक सुस्थिति आणि औद्योगिक प्रगति ह्यांचेवर अवलंबून असल्यानें तीमध्यें घट होईल असा रिझर्व्ह बँक आणि सरकार ह्यांचा अंदाज आहे. असें झाल्यास विलायतेवरच्या हुंड्यांस आयात करणारांची असलेली मागणी मर्यादित होऊन हुंडणावळीच्या दरास तिच्या दडपणाचा भार सहन करावा लागतो, तो हलका होईल आणि त्याची खालीं जाण्याची प्रवृत्ति थांबेल ( म्हणजेच हुंडणावळ स्थिर होईल ) अशी त्यांची अपेक्षा आहे. आयात-निर्गतीमधलें अंतर तुटण्यास अवधी लागेल; त्या काळांत हुंडणावळीच्या दरास टेकू देण्याचें सामर्थ्य रिझर्व्ह बँकेमध्यें आहे असें जाहीर झालें आहे, ह्यावरून वरील अंदाज आणि अपेक्षा ह्यांचें हृद्गत स्पष्ट होतें. विलायती हुंडी आज पडली आहे, ती हळु हळु सावरेल आणि तिला आधार देण्यासाठी रिझर्व्ह बँक स्वतः तिची खरेदी करण्याचें बंद ठेवील. ह्या हुंडीमार्फत विलायतेस पैसे न पाठवतां बँक आपल्या लंडनमधील गंगाजळींतून उचल करील. तेथील बँकेची शिल्लक, वर्ष-दोन वर्षें अवधी लागला तरी पुरेल, एवढी आहे. तेव्हां हुंडणावळीच्या दरांत घट तात्पुरती झाली म्हणून बिचकून जाण्याचें आणि तो कायमचा कमी करण्याविषयीं चर्चा करण्याचेंहि आज प्रयोजन नाहीं, अशा प्रकारची, रिझर्व्ह बँक आणि सरकार ह्यांची विचारसरणी आहे.

रिझर्व्ह बँकेची गंगाजळी आहे तरी किती आणि हुंडणावळ उचलून धरण्यास ती कितीशी उपयोगी पडेल ह्याचा विचार करतां "एकॉनॉमिस्ट" ह्या ब्रिटिश साप्ताहिकानें बनवलेला तक्ता खालीं दिला आहे, तो सहायकारक होईल:—

रिझर्व्ह बँकेची गंगाजळी

( आकडे दशलक्ष रुपयांचे आहेत )

| | २८ मे, १९३७ | २७ मे, १९३८ | तफावत |
|---|---|---|---|
| सोनें ... | ४४५ | ४४४ | –१ |
| लंडन मधील शिल्लक | २४५ | २० | –२२५ |
| ब्रिटिश रोखे ... | ८०३ | ७८८ | –१५ |
| एकूण | १,४९३ | १,२५२ | –२४१ |

रिझर्व्ह बँकेच्या गंगाजळीपैकी सोन्यांत विशेष घट गेल्या एक वर्षांत झालेली नाहीं, पण लंडन मधील शिल्लक आणि रोखे २४ कोटि रुपयांनीं कमी झाले आहेत असें वरील आकड्यांवरून दिसून येईल.

---

६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन

त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

कॉमनवेल्थ विमा कंपनी

लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेची विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर

बी. ए. एलएल. बी.

मॅनेजिंग एजंट.

दि प्रॉव्हिन्शिअल बँक

ऑफ अिंडिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय: २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगळूर

शाखा: मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष: खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर: अेस्. पी. ठाकर.

करण्ट डिपॉझिट अकाउण्टस्: १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस्: ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

कायम मुदतीच्या ठेवी: दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें.

एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

# स्फुट विचार

### खंडकरी कायद्याची चर्चा

जमीन--मालक आणि खंडकरी ह्यांचे संबंध निश्चित करणें आणि शेतकऱ्यांच्या कर्जाचा बोजा हलका करणें हे दोन महत्त्वाचे प्रश्न मुंबईच्या प्रधानमंडळानें हातीं घेतले असून त्यांच्या बाबतींतल्या कायद्याचे मसुदे प्रांतिक विधिमंडळापुढें येत्या बैठकींत मांडले जावयाचे आहेत. ह्यांपैकीं विशेषतः पहिल्या प्रश्नासंबंधानें तीव्र मतभेद उत्पन्न झालेला होता आणि जमीन--मालकांनीं सरकारच्या योजनेस जोराचा विरोध चालविला होता. विधिमंडळांतील कित्येक कॉंग्रेसपक्षीय सभासदांसहि प्रधानमंडळाचें धोरण मान्य नव्हतें. तथापि, त्या धोरणाचें स्वरूप निश्चित आणि स्पष्ट झालेलें नसल्यामुळें नियोजित कायद्याविरुद्ध घेतले जाणारे आक्षेप स्थूलमानाचे असणें स्वाभाविक होतें. ही परिस्थिति लक्षांत घेऊन विधिमंडळांतील कॉंग्रेसपक्षीय सभासदांशीं प्रस्तुत विषयाची चर्चा करून कायद्याच्या मसुद्याचें स्वरूप ठरविण्याचा उपक्रम गेल्या शनिवारीं व रविवारीं प्रधानमंडळानें केला, हें ठीकच झालें. सरकारचें उद्दिष्ट आणि योजना ह्यांचेवर केल्या जाणाऱ्या टीकेचा सांगोपांग विचार होण्यास ह्या योगानें संधी मिळाली आणि तडजोडीच्या स्वरूपाचा निकाल होण्यास सहाय झालें. ह्या प्रश्नाच्या निर्णयास दोन टोकें आहेत. सामान्य करारांच्या भूमिकेवरची प्रचलित पद्धति समाधानकारक असून तीमध्यें कोणताहि बदल सरकारनें करूं नये ही एक बाजू आणि जमीन कसणारा हाच तिचा वास्तविक मालक असणें अगत्याचें असल्यानें खंडकऱ्यास शक्य तेवढी आर्थिक व कायद्याची सत्ता देणें योग्य आहे, ही दुसरी बाजू. ठराविक अटींवर खंडकऱ्यांस जमीन कसण्याचा कायम हक्क देणें आणि त्याचे व मालकाचे हितसंबंध ह्यांचा मेळ घालणें ही त्यांमधील तडजोडीची व्यवस्था होय आणि तीच गेल्या रविवारच्या सभेंत मान्य झाल्याचें दिसतें. मालक आपली जमीन स्वतःच करील तर खंडकऱ्यांचा प्रश्नच उद्भवतच नाहीं. त्याचप्रमाणें, खंडाची योग्य रकम खंडकरी मालकास वेळच्यावेळीं देणार नाहीं किंवा जमिनीची खराबी करील तर त्याचा जमीन कसण्याचा कायमचा हक्क नाहींसा होईल. हा निर्बंध मालकाच्या हितसंरक्षणाचा आहे. तसेंच, खंडाची देणें बाकीहि खंडकऱ्यानें देऊन टाकल्यावांचून त्यास नवीन हक्क प्राप्त होणार नाहीं. शंभर एकरांपेक्षा कमी क्षेत्र असलेल्या मालकांस नवा कायदा लागू होणार नाहीं, हा नियोजित अपवाद तर अत्यंत महत्वाचा आहे. लहान सहान शेतकरी आणि सामान्य पांढरपेशे, "जमीनदार" ह्या लठ नांवाच्या जात्यांत भरडून निघण्याची भिती ह्या योजनेनें दूर होणार आहे. गेल्या शनिवार--रविवारच्या चर्चेतून वरील आशयाचा निर्णय निघाल्याचें प्रसिद्ध झालें आहे. त्याचा सविस्तर विचार पुढें करावा लागेल.

---

### शेतकऱ्यांच्या कर्जाचें निवारण

शेतकऱ्यांच्या डोक्यांवर कर्जाचा अवजड बोजा आज आहे तो हलका करण्यासाठीहि प्रांतिक प्रधानमंडळानें योजना आखली असून तिची चर्चा शनिवार-रविवारच्या सभेंत झाली. ह्याहि बाबतींत शंभर एकरांचे वर जमीन असणाऱ्या मालकांस कायद्यानें सवलत मिळावयाची नाहीं असा सरकारचा बेत आहे. लहान शेतकरी किंवा जमीन-मालक ह्यांस खंडकऱ्यां विषयींच्या कायद्याचा त्रास देण्यांत स्वारस्य नाहीं, तसेंच, मोठ्या जमीनदारांस कर्जफेडीचे बाबतींत सवलती देण्यांतहि अर्थ नाहीं अशी प्रधान मंडळाची भूमिका आहे. कायद्याचें संरक्षण द्यावयाचें तें आर्थिक व सामाजिक दृष्टींनीं निर्बल असलेल्या लोकांसच देणें उचित आहे हें या धोरणांतलें तत्त्व आहे आणि तें सर्वमान्य होण्याजोगें आहे. १९३२ सालीं असलेल्या कर्जाऊ रकमेंत ३० टक्के सवलत ऋणकोस मिळावी अशी सरकारची योजना आहे. शेतीच्या कामासाठीच हें कर्ज ऋणकोस झालेलें असलें पाहिजे असा त्यांत निर्बंध घालण्यांत येईल. प्रत्येक कर्जाची छाननी केली जाईल आणि वरील प्रमाणांत त्यास काट देण्यांत येईल. लवादामार्फत कर्जाची तडजोड होण्याच्याऐवजी हें प्रमाण सरसकट अमलांत येऊन त्यापुरती कर्जदारास सूट मिळेल. गेल्या सहा वर्षांतल्या कर्जास हा नियम लागणार नाहीं, कारण, हा काळ आर्थिक मंदीचा असल्यानें त्या कर्जाबाबत सवलत देणें आवश्यक नसून तें धनकोस निष्कारण अन्यायाचें होईल. अलीकडच्या स्वस्ताईमुळें पूर्वीच्या कर्जाचा बोजा वाढला आहे. उदाहरणार्थ, १९३२ च्या मागचें शंभर रुपयांचें कर्ज फेडावयास ऋणकोस त्या वेळच्या मानानें आतां अधिक माल द्यावा लागेल पाहिजे. तसेंच, धनकोस ह्या शंभर रुपयांची किंमत मालाचे स्वरूपांत आज पूर्वीपेक्षा अधिक मिळण्यासारखें होणार आहे. तीस टक्क्यांची काट बसूनहि ऋणकोच्या जिंदगीपेक्षा अधिक कर्जाची बाकी राहिल्यास तिला सूट मिळणें अपरिहार्य होईल. डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स रिलीफ ॲक्टाच्या मुळाशीं असलेलें कर्ज--सवलतीचें तत्त्व लोकांच्या परिचयाचें असल्याकारणानें प्रधानमंडळानें योजिलेल्या कर्जनिवारण कायद्यास खंडकरी कायद्याप्रमाणें मूलग्राही विरोध होण्याचा संभव नाहीं. तथापि, दोन्हीहि योजनांचे बाबतींत व्यावहारिक दृष्टीनें तपशीलवार चर्चा होणें आवश्यक आहे.

---

### स्तुत्य उपक्रम

हिंदुस्थानांतल्या रेलवेज बहुतेक सरकारच्या म्हणजे लोकांच्या मालकीच्या असून त्यांचा कारभारहि सरकारी आहे. असें असूनहि त्यांमधल्या मोठ्या पगाराच्या जागा हिंदी लोकांच्या वांट्यास येत नाहींत अशी कित्येक वर्षांची तक्रार आहे. ह्या देशांत विश्वविद्यालयांस जोडलेलीं एंजिनिअरिंग कॉलेजें असतांना आणि उच्च शिक्षणाच्या इतर सोयी असतांना उच्च दर्जाचे नोकर विलायतेमधून आणावे लागणें हें भूषणावह आहे असें म्हणतां येणार नाहीं. रेलवेजच्या कारभारांत ज्या प्रकारची लायकी अधिकारी वर्गास लागते, तिच्या बाबतच्या शिक्षणाची व्यवस्था ह्या देशांत करतां येण्यास वास्तविकपणानें अडचण भासूं नये. रेलवेजच्या कारभाराचें सोपपत्तिक शिक्षण देण्याची व्यवस्था आमच्या विश्वविद्यालयांस करतां येऊन त्या संबंधांतलें व्यावहारिक शिक्षण प्रत्यक्ष सरकारी रेलवेजमध्येंच देतां येण्यासारखें आहे. हा प्रश्न इतका सरळ असतां त्या विषयींची पद्धतशीर व्यवस्था आजपावेतों कां झाली नाहीं, ह्याचें आश्चर्य वाटतें. वरच्या दर्जाच्या जागांवर हिंदी तरुणांस नेमण्याचें धोरण रेलवेजनीं अलीकडे स्वीकारलें आहे, ही गोष्ट खरी आहे. तथापि, कलकत्त्याच्या विश्वविद्यालयानें ह्या क्षेत्रांतल्या शिक्षणाच्या तजवीजीचा उपक्रम करण्याचें ठरविलें आहे ही अत्यंत स्तुत्य अशी गोष्ट आहे. रेलवेजच्या वहातुक-खात्यांतल्या कामासाठीं दरवर्षी शंभर लोक शिकून तयार होतील अशी ही योजना आहे. लंडन स्कूल ऑफ

इकॉनामिक्सनें अशी सोय केली आहे आणि तेथील इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सपोर्टमध्यें ह्या क्षेत्रांतलें शिक्षण दिलें जातें. हिंदुस्थानांत ह्या धर्तीवर इन्स्टिट्यूट असावें अशी वेजवुड कमिटीचीहि शिफारस होती. त्या संबंधांत योजना आखण्यासाठी कलकत्ता युनिव्हर्सिटीनें एक स्वतंत्र समिति नेमली आहे. उच्च दर्जाचें व्यवहार शिक्षण आमच्या विश्वविद्यालयांच्या कक्षेत अधिकाधिक येत जाणें आवश्यक आहे.

### व्यापार घटत चालला—उपाय काय ?

गेल्या वर्षाच्या मध्यापर्यंत जगांतील प्रमुख राष्ट्रांमध्यें आर्थिक मंदीस आळा बसून चलतीची कमान हळुहळु चढत होती आणि उद्योगधंदे व व्यापार ह्यांचें चक्र सुरळीतपणानें फिरत रहाणार अशी आशा वाटत होती. परंतु अलीकडे ही कमान उतरत असून आर्थिक मंदी स्थायिक होते कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. ही परिस्थिति सर्वच राष्ट्रांस चिंताजनक होणें साहजिक आहे आणि ती सुधारण्याच्या उपायांची चर्चा होणें हेंहि अपरिहार्य आहे. जागतिक उत्पादन बहुतेक देशांत घटलें आहे आणि कच्च्या मालाचे बाजारभाव उतरले आहेत. मध्यंतरीं उत्पादन वाढल्याकारणानें हे बाजारभाव चढले होते, पण आतां कच्च्या मालास कमी मागणी येत असल्यानें मंदीची छाया पुन्हां चोहोंकडे पसरली आहे. हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापारांत निर्गत मंदावली असून त्या मानानें आयात घटलेली नाहीं आणि ह्याचा प्रतिकूल परिणाम हुंडणावळीवर झाला आहे हें आम्हीं दाखविलेंच आहे. ब्रिटिश कारखानदारांच्या संघानें ग्रेटब्रिटनच्या व्यापाराचीहि अशीच अवस्था झाली असल्याचें आपल्या बोर्ड ऑफ ट्रेड ह्या सरकारी खात्याच्या निदर्शनास आणलें आहे. कित्येक देश इंग्लंडकडून घेतात त्यापेक्षा अधिक माल तिकडे पाठवतात, ह्यामुळें ग्रेट-ब्रिटनला त्यांचें देणें निघतें. अशा अकरा देशांचा दाखला संघानें दिला आहे आणि त्यांचें एकूण देणें सुमारें ४८० कोटि रुपये होतें असें म्हटलें आहे. जे देश ब्रिटिश माल योग्य प्रमाणांत घेतील त्यांसच सवलतीनें वागवण्यांत यावें आणि निर्गत व्यापाराच्या उत्तेजनार्थ ज्या देशांत सरकारी द्रव्यसहाय दिलें जातें त्यांच्या मालाच्या आयातीवर इंग्लंडमध्यें नियंत्रण घातलें जावें अशी सूचना त्यानें केली आहे. स्वदेशी धंदे आणि व्यापार ह्यांच्या संरक्षणासाठी ब्रिटिश सरकार उपाय योजीत आहे त्यांस धरूनच ह्या सूचना आहेत, हें सांगावयास नको.

### " रूरल रीकन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन "

मुंबई प्रांतांतील शेतकऱ्यांच्या उत्पादक शेती व्यवसायास सहाय करण्याचे हेतूनें एक पांच कोटि रुपयांचा फंड उभारून त्यांतून शेतकऱ्यांस अल्प दरानें कर्जें देण्याचा मुंबई प्रांतिक सरकारचा विचार आहे. ह्या फंडाचा कारभार पहाण्याचें काम वरील प्रकारच्या कॉर्पोरेशनकडे सोपविण्यांत येईल असें समजतें. फंडांतील रकमांवरील ३ टक्के व्याजाची हमी सरकार घेणार असल्यानें, कॉर्पोरेशनला पुरेसें भांडवल मिळेल, अशी अपेक्षा आहे. वरील योजनेस मध्यवर्ती सरकारची मंजुरी मिळवावी लागेल. ह्या सर्व कार्याची व्यवस्था पहाण्याकरितां मंत्रिमंडळांत आणखी एक मंत्रि घेतला जाण्याचा संभव आहे.

### औंध संस्थानांतील सारामूट

धान्याचे व शेतकींतील मालाचे अलीकडे उतरलेले बाजारभाव व आर्थिक मंदी यामुळें सर्व सामान्यतः झालेली शेतकरीवर्गाची हलाखीची स्थिति याचा विचार करितां संस्थानांतील शेतकरीवर्गास त्यांजकडून येणें असलेले मागील जमीनसाऱ्याचे बाकीचे वसुलापैकीं कांहीं सवलत देणें जरूर असल्याचें दिसून आलेवरून खालीलप्रमाणें तालुकेवार मागील येणें जमीनसाऱ्याचे बाकींपैकीं सूट दिली असल्याचें औंध सरकारनें जाहीर केलें आहे.

| | |
|---|---|
| गुणदाळ तालुका. | रु. २२,००० |
| कुंडल तालुका. | रु. १२,००० |
| आटपाडी तालुका. | रु. ५,००० |
| औंध तालुका. | रु. १,००० |

एकूण सूट रु. ४०,०००

### रॉकेल—किंमत आणि कर

रॉकेल आणि तदंगभूत पदार्थ ह्यांबद्दल ग्राहकांस जी किंमत द्यावी लागते, तिचे मानानें उत्पादकांस नफा किती रहातो आणि सरकारी करांमध्यें किती रकम जाते ह्याची कल्पना बर्मा ऑईल कंपनीच्या साधारण सभेचे प्रसंगीं तिचे अध्यक्ष, सर जॉन कार्गिल ह्यांनीं दिली. ते म्हणाले:—" मालाच्या विक्रीची ठोकळ किंमत १०० धरली तर तिच्यापैकीं सुमारें १७ केरोसीनबद्दल व ९½ बेन्झीनबद्दल शिल्लक राहून सरकारी पट्टी व कर ह्यांबद्दल अनुक्रमें करून २९ आणि ४४ गेले." इतकेंहि करून कंपनीस गेल्या सालीं धंद्यांतला निवळ नफा सुमारें ३½ कोटि रुपये झाला.

### हिऱ्यांच्या विक्रीची किंमत

हिऱ्यांच्या वार्षिक विक्रीची सर्व जगांतील मिळून किंमत अलीकडे सुमारें १२ कोटि रुपये भरते. अमेरिका हिऱ्यांचें फार मोठें गिऱ्हाइक आहे.


**Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.**

## " URBAN BANKS "

BY

L. K. BHAGWAT,

*Chief Accountant,*

**Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.**

The book written in English, besides fully, describing the structure and functions of; all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it. " Price. Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat. Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14.

## ग्रामोद्योगाला सरकारकडून मिळालेली मदत

अखिल भारतीय ग्रामोद्योग संघानें सरकारकडे पाठविलेल्या निरनिराळ्या योजनांना मदत म्हणून १९३७–३८ सालीं मिळालेल्या रकमेचा विनियोग कसा झाला ह्याचा थोडक्यांत सारांश खालीलप्रमाणें आहे.

### १ गूळ उत्पत्ति

१९३७ सालांतील नोव्हेंबर महिन्याचे अखेर सरकारची मंजुरी आल्याकारणानें शिंदीचे झाडापासून रस काढण्याच्या हंगामाचा पुरेपूर उपयोग करितां आला नाहीं, कारण ह्या हंगामास पावसाळ्यानंतर आक्टोबर महिन्यापासून सुरवात होते. ह्या कामासाठी ५ केंद्रें सुचविलीं होतीं तीं खालीलप्रमाणें–

| जिल्हा | केंद्र |
|---|---|
| १ मुंबई उपनगर | विलेपार्ले. |
| २ ठाणा | बोर्डी (डहाणू तालुका) |
| ३ सुरत | हरिपुरा (बार्डोली ता.) ( जलालपूर ऐवजी ) |
| ४ बेळगांव | होसूर (सौंदत्ती तालुका) |
| ५ उत्तर कर्नाटक | भटकळ ( होनावर ऐवजी ) |

श्री. शिवबालक विसेन ह्यांच्या पसंतीनें झाडापासून रस काढणारे तीन लोक बंगालमधून आणविले. स्वतः श्री. विसेन ह्यांना हरिपुऱ्याला जादा शिक्षक म्हणून नेमले होतें. ह्या चौघांचा जाण्यायेण्याचा एकूण खर्च रु. २६७ झाला.

भटकळ व होसूर ह्या दोन्ही ठिकाणीं स्थानिक माणसें मिळालीं होतीं. त्यांपैकीं तीन भटकळ येथें व एक होसूर येथें अशीं नेमलीं होतीं.

ह्या सगळ्या रस काढणाऱ्यांना गूळ बनविण्याची पद्धत सुद्धा माहीत होती. भटकळ व बोर्डीखेरीज करून इतर ठिकाणीं मात्र ह्या कामाकरितां स्वतंत्र मदतनीस द्यावे लागले. ह्या सर्व ठिकाणीं मदतनीसाचें काम विद्यार्थी करीत होतेच.

भटकळला एक जादा शिक्षक ह्या लोकांना माहिती देण्यासाठीं नेमला होता. कारण तेथें काम जास्त दिवस सुरू होतें आणि इतर केंद्रांपेक्षा विद्यार्थ्यांची संख्याहि जास्त होती.

गुळवे, रस काढणारे व तसेंच जादा शिक्षक ह्या सर्व लोकांचा पगार खर्च रु. ६९३-१३-८ इतका झाला.

ज्या विद्यार्थ्यांनीं ह्या केंद्रीं शिक्षण घेतलें त्यांची संख्या व कालावधि ह्यांचा तपशील खालीलप्रमाणें आहे.

| केंद्र | संख्या | काळ |
|---|---|---|
| विलेपार्ले | २ | ४ महिने |
| | २ | १ महिना |
| बोर्डी | ८<br>१३<br>१९ | १ महिना |
| हरिपुरा | ५ | १ महिना |
| | १ | ½ ,, |
| होसूर | १ | ½ महिना |
| | ५<br>८ | १ महिना |
| भटकळ | १२<br>१०<br>१० | १ महिना |

शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या एकूण ९६ होती व त्यांच्या शिक्षणाकरितां शिष्यवृत्ति म्हणून ९५४-८-० रु. इतका खर्च झाला. एक्साइज कमिशनरकडे केलेल्या अर्जावरून सरकारनें ताडीपासून गूळ बनविण्याविषयींचे परवान्याचे नियमांत आमच्या जरूरीपुरते बदल केले.

फक्त भटकळ खेरीज इतर सर्व केंद्रांतून शिंदीचे झाडापासून रस काढला व भटकळला नारळीचे झाडापासून रस काढिला.

निरनिराळे अनुभव जरी निरनिराळ्या केंद्रांतून आले तरी ज्या केंद्रांतून रस काढण्याचें काम पद्धतशीर रीतीनें करण्यांत आलें, त्या केंद्रांतील अनुभवावरून असें वाटतें कीं, शिंदीचे झाडापासून रस काढण्याची परवानगी जर व्यक्तिशः लोकांना अगर भाड्यानें झाडें घेऊन रस काढणाऱ्या लोकांना दिली तर हा धंदा एक जोड धंदा म्हणून होईल व ह्या लोकांचे उत्पन्नांत भर घालील.

अशा प्रकारच्या परवान्याची व ग्रामी जनतेस असें शिक्षण देण्याची गरज विशेषतः ज्या ठिकाणीं मद्यपानबंदी अमलांत यावयाची व ज्या ठिकाणीं ताडीसाठी शिंदीच्या झाडापासून रस काढण्याची बंदी अमलांत यावयाची अशा ठिकाणीं विशेष आहे.

संघानें उघडलेल्या केंद्रांतील आतांपर्यंतच्या अनुभवावरून असें दृष्टोत्पत्तीस आलें आहे कीं, ताडीच्या रसापासून गूळ बनविण्याची कल्पना अमलांत आणण्यास फारसा खर्च होत नाहीं व केंद्रांतून साधारण शिक्षण घेतल्यानंतर रस काढणाऱ्यांना त्याचप्रमाणें इतर सर्वसाधारण शेतकऱ्यांनासुद्धा हा उद्योगधंदा हातीं घेणें शक्य होईल. ( अपूर्ण )

---

### कपाशीचें उत्पादन आणि उठाव

कपाशीच्या उत्पादनाचे दृष्टीनें महत्त्वाचे देश म्हणजे अमेरिका, इजिप्त, हिंदुस्थान आणि ब्राझील हे होत. आंतरराष्ट्रीय व्यापारांत येणाऱ्या कपाशीपैकीं शेकडा ९० इतकी कपास ह्या देशांत उत्पन्न झालेली असते. जगांतील सर्वांत जास्त उत्पादन अमेरिकेंत होतें व तोच देश कपाशीचें सर्वांत मोठें गिऱ्हाइकहि आहे. रशिया आणि चीन ह्या देशांतहि बरीच कपास निघते, परंतु ती त्या देशांबाहेर विक्रीसाठी जात नाहीं. कपाशीच्या जागतिक उत्पादनासंबंधांतले आकडे येथें दिले आहेत:—

**कपाशीचें उत्पादन**

( १ गाठ = ५०० पौंड कपास. आकडे हजार गाठींचे )

| देश | वार्षिक उत्पादन |
|---|---|
| अमेरिका | १२,३९९ |
| ब्राझील | १,७१२ |
| हिंदुस्थान ( १ गाठ=४००पौंड ) | ६,३०७ |
| चीन | ३,७६० |
| रशिया | ३,५५० |
| इजिप्त | १,८२१ |
| जगांतील एकूण उत्पादन | ३२,३०९ |

जगांतील कपास कापडाच्या गिरण्यांत सुमारें ३ कोटि गाठी कपास खपते. अमेरिकेंतील गिरण्यांस ७९ लक्ष गाठी कपास लागते, जपानमधील गिरण्यांत ४० लक्ष गाठींचा उठाव होतो आणि हिंदी गिरण्यांत ३० लक्ष गाठी कपाशीचें कापड बनविण्यांत येतें. ग्रेटब्रिटनमधील उठाव २८½ लक्ष गाठींचा आणि जर्मनी व फ्रान्समधील प्रत्येकीं ११ तें १२ लक्ष गाठींचा आहे.

## व्यापार आणि जकाती

### सोलापूर रोटरी क्लबांत प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

व्यापारी देवघेव, ती करणाऱ्या दोन्ही पक्षांस फायद्याची वाटल्यावांचून होऊं शकणार नाहीं, हें आद्य तत्त्व लक्षांत न आल्या कारणानें त्याच्या मार्गांत अडचणी उत्पन्न करण्याचा प्रयत्न होत असतो. मालाची खरेदी आणि त्याची राष्ट्रीय आयात ह्यांच्या योगानें व्यक्ती आणि देश दुसऱ्यांचे देणेकरी बनतात आणि ह्याच्या उलट, विक्री व निर्गत ह्यांच्या व्यवहारानें ते घेणेकरी होतात. ह्याकरितां, निर्गतीस उत्तेजन आणि आयातीवर नियंत्रण असें दुहेरी धोरण राष्ट्रांनीं अमलांत आणावें अशा प्रकारची विचारसरणी अठराव्या शतकांत युरोप खंडांत पसरली होती. तिचें सदोषत्व निदर्शनास आणून व्यापाराच्या मुळाशी देणारा व घेणारा ह्या दोघांचेंहि हित कसें असतें हें अर्थशास्त्रज्ञांनीं स्पष्ट सिद्ध केलें. राष्ट्रांचें व्यापारी सहकारित्व परस्पर-उपकारक असतां जकातींच्या निर्बंधांच्या अडचणी त्याच्या मार्गांत कां आणि कशा निर्माण केल्या जातात ह्याचें विवेचन सोलापूर येथील रोटरी क्लबापुढील आपल्या व्याख्यानांत प्रो. काळे ह्यांनीं गेल्या आठवड्यांत केलें. जकातींचे राष्ट्रीय सीमांवर उभारलेले तट उतरल्या वांचून जागतिक व्यापार सुधारून मंदी नाहींशी होणार नाहीं असें प्रत्येक पाश्चात्य मुत्सद्दी म्हणत आहे, परंतु त्याबरोबरच लढाऊ तयारी जारीनें चालू रहाण्याचें महत्वहि प्रतिपादित आहे. साम्राज्यतृष्णा, दुसऱ्याचें स्वातंत्र्य हरण करण्याची इच्छा, राजकीय महत्त्वाकांक्षा यांनीं अनेक बलवान राष्ट्रांस पछाडलें आहे. त्यांच्या प्राबल्यावर आणि लढाऊ बेतावर तोड म्हणून इतरांस स्वसंरक्षणार्थ शस्त्रास्त्रांची तयारी करावी लागत आहे. अनियंत्रित व्यापार म्हणजे दुसऱ्यांवर आणि शत्रूंवर अवलंबून रहाणें होय ह्या भावनेनें आयातीवर जबर नियंत्रणें राष्ट्रें लादीत आहेत आणि हें राष्ट्रांच्या संरक्षण योजनेचें महत्वाचें अंग गणण्यांत येत आहे. त्यासाठींच प्रत्येक राष्ट्र आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण होण्याचा जारीनें यत्न करीत आहे. आंतरराष्ट्रीय देवघेव ह्या कारणानें संपुष्टांत आली आहे आणि आर्थिक घटनेंत कृत्रिमपणा शिरला आहे. महायुद्धानंतर झालेल्या शांतता तहाचा हा एका प्रकारानें परिणाम आहे असें म्हणतां येईल. ह्या पुढें आंतरराष्ट्रीय व्यापाराची घडी बसेल ती पूर्वीप्रमाणें अनियंत्रित विनिमयाच्या तत्त्वावर बसणार नाहीं. प्रत्येक राष्ट्र, आपल्या हितास व स्वातंत्र्यास बाध न येतां त्यांस पुष्टी मिळेल ह्या बेतानें स्वतःचे उद्योगधंदे व व्यापार ह्यांचें संघटन करील. आर्थिक स्वयंपूर्णतेचे सध्याचे राष्ट्रीय प्रयत्न आधुनिक सुधारणा आणि संस्कृति ह्यांची पीछेहाट करीत आहेत ह्यांत संशय नाहीं. परंतु बदललेल्या परिस्थितीस अनुसरून राष्ट्रांनीं आपलें आर्थिक धोरण निश्चित करावें हें स्वाभाविक आणि क्रमप्राप्तच आहे. "सेवा अगोदर, स्वार्थ मागाहून" हें रोटरी चळवळीचें मूलभूत तत्त्व वास्तविक पहातां व्यापाराचा आधार आहे. व्यापारांत स्वतःचें आणि दुसऱ्याचें हित सारखेंच साधतां येतें. पण त्याच्या व्यवहाराचे मार्ग सरळ आणि दुसऱ्याच्या संपत्तीचा अपहार करण्याच्या बुद्धीचे असतां कामा नयेत. जगामध्यें आज जी आंतरराष्ट्रीय यादवी व जो राजकीय धुडगूस चालला आहे, तो अशा सर्वोपकारक आर्थिक देवघेवीस सर्वस्वी प्रतिकूल आहे.

---

## सोलापुरांत "अभ्यास मंडळा"ची स्थापना

### हिंदी हुंडणावळीच्या प्रश्नावर भाषण

स्थानिक लिबरल असोसिएशनच्या विद्यमानें सोलापुरांत "अभ्यास मंडळा"ची स्थापना औपचारिक रीतीनें गेल्या आठवड्यांत प्रो. काळे ह्यांच्या हस्तें झाली. बॅरिस्टर सरदार, दि. ब. लिमये, श्री. साठे इत्यादि स्थानिक प्रागतिक पुढाऱ्यांचा त्या उपक्रमास चांगला पाठिंबा आहे. सामाजिक आणि आर्थिक परिस्थिति व घटना ह्यांवर दृढ परिणाम ज्यांचे योगानें होतील असे कायदे सध्याच्या लोकशाहीच्या मन्वंत होत आहेत. ते इष्टफलदायी व्हावे ह्यासाठी त्यांच्या मुळाशी असलेल्या प्रश्नांचा अभ्यास श्रमपूर्वक होणें अगत्याचें आहे असें प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. नवीन अभ्यासमंडळ पक्षातीत असल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें आणि अभ्यासाच्या योग्य पद्धतींचें दिग्दर्शन केलें. काँग्रेस प्रधानमंडळास अभ्यासू लोकांनीं गोळा केलेल्या या माहितीचा उपयोग होईल आणि तें अशा प्रयत्नाचें स्वागतच करील असा विश्वास त्यांनीं प्रकट केला. सार्वजनिक हिताचे अनेक महत्वाचे प्रश्न अभ्यासकांची वाट पहात आहेत, तथापि अभ्यासाचें काम कंटाळवाणें व श्रमाचें असल्यानें त्यांत उत्साह, श्रद्धा आणि चिकाटी ह्या गुणांची आवश्यकता आहे. मंडळांत थोडेच अभ्यासू लोक आले तरी निराश होऊन चालावयाचें नाहीं, अशी सूचना त्यांनीं दिली. सोलापूरच्या अभ्यास मंडळाची स्थापना झाल्याचें औपचारिक रीत्या सांगून स्थानिक जिज्ञासूंच्या आग्रहावरून प्रो. काळे ह्यांनीं "हिंदी हुंडणावळीचा प्रश्न" ह्या विषयावर भाषण केलें.


**रु. १४,५०० आणि त्याखेरीज नफा.**

वार्षिक हप्ता रु. १७५ भरून दरमहा रु. ४१-१०-८ वीस वर्षेपर्यंत मिळून त्याखेरीज रु. ५०००|— रक्कम व नफा मिळेल. भरलेल्या हप्त्यावर शे. ९ टक्के व्याज.

एम्. कानजी ॲण्ड कंपनी, मॅनेजिंग एजन्टस् — एस. सूर्यराव आणि कंपनी, महाराष्ट्राचे मुख्य एजन्टस्

धी युनिव्हर्सल फायर ॲण्ड जनरल इन्शुअरन्स कंपनी लि., लक्ष्मीरोड, पुणें २

# सहकारी चळवळ

## पतपेढ्यांच्या पोटनियमांतील दुरुस्त्यांचीं प्रकरणें

### सरकारी हस्तपत्रक पीपी

(पोटनियमांच्या दुरुस्त्या)

सहकारी पतपेढ्यांच्या पोटनियमांच्या दुरुस्त्या मंजूर करणें, व त्या नोंदणें या कामीं मुख्यत्वेंकरून खालील कारणांमुळें विलंब लागतो:—

(१) पोटनियम-दुरुस्तीचीं प्रकरणें अपूर्ण अवस्थेंत येतात; व

(२) तत्संबंधींचे जे मामुली नियम सहकारी कायदा, कानू, सोसायटीचे पोटनियम व मे. रजिस्ट्रारसाहेब यांचीं सर्क्युलरें यांत सांगितले असतील ते पाळले जात नाहींत.

सबब सहकारी पतपेढ्यांच्या माहितीं व तजविजीकरितां खालील संकलित सूचना देण्यांत येत आहेत.

सामान्य:—

(१) पोटनियमांतील शब्दांत, शब्दसमूहांत, वाक्यांत अगर पॅरेग्राफांत अधिक घालणें किंवा उणें करणें किंवा बदल करणें याचा अर्थ पोटनियमांत दुरुस्ती करणें असा होईल.

(२) कोणतीहि पोटनियमांतील दुरुस्ती सहकारी कायदा व कानू (कलम १६) यांच्या विरुद्ध किंवा सोसायटीच्या इतर पोटनियमांशीं विसंगत असूं नये.

(३) पोटनियमांतील दुरुस्ती मे. रजिस्ट्रारसाहेब यांनीं पसंत करून व नोंदून तशा अर्थाची त्यांच्या सही व शिक्यानिशीं (कलम १६) यादी त्यांनीं सोसायटीकडे पाठविल्यानंतरच फक्त अंमलांत आणितां येईल.

पोटनियम-दुरुस्तीची पद्धत (नियम ६ पहा):—

(१) साधारणसभा भरविणेपूर्वीं पोटनियमांप्रमाणें योग्य प्रकारें नोटीस दिली पाहिजे. नोटिशीची मुदत, कोणास नोटीस द्यावयाची, कोणत्या पद्धतीनें द्यावयाची, नोटिशींत नमूद करावयाची माहिती (सभेची तारीख, वेळ आणि ठिकाण, व सभेपुढें यावयाच्या नक्की पोटनियम-दुरुस्त्या) नोटिशीच्या मूळ अस्सल प्रतीवर, पोटनियमांत अधिकार दिल्याप्रमाणें कोणत्या एक अगर अनेक अधिकाऱ्यांनीं सह्या करावयाच्या, या गोष्टीकडे लक्ष पुरवून त्या काळजीपूर्वक अमलांत आणाव्या. (नमुना पुरवणी नं. १)

(२) मे. रजिस्ट्रारसाहेब यांच्या मंजुरीकरितां जी पोटनियम दुरुस्ती पाठवावयाची ती साधारणसभेनें मंजूर केलेली असली पाहिजे व खालील गोष्टी अमलांत आणिल्या पाहिजेत:—

(अ) ज्या साधारणसभेंत पोटनियम-दुरुस्ती मंजूर झाली, त्या साधारणसभेस कोरम असला पाहिजे. किती सभासद हजर असले म्हणजे 'कोरम' होतो हें पोटनियमांत लिहिलेलें असतें. जर सभेस कोरम नसेल तर ती सभा तहकूब ठेवावी. जर तहकुबीनंतर भरविलेल्या सभेसहि कोरम होण्याइतके सभासद सभेच्या ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाचे अवधींत हजर न राहतील तर जेवढे सभासद हजर असतील तेवढ्यावर सभेचें काम करतां येईल.

(ब) दुरुस्त्यांना साधारणसभेनें द्यावयाची मंजुरी ठरावाचे नमुन्यांत असावी.

(क) ठराव हे नेहमीच्या मामुली पद्धतीनें सुचविले पाहिजेत, त्यांना अनुमोदन दिलें पाहिजे, व सभेंत हजर असलेल्या (फक्त मत देणाऱ्या नव्हे) एकंदर सभासदांच्या निदान ⅔ अनुकूल बहुमतानें मंजूर झाले पाहिजेत.

(ड) साधारणसभेच्या ज्या ठरावानें दुरुस्त्या मंजूर झाल्या असतील त्या ठरावाची एक नकल साधारणसभा भरल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांचे आंत मे. रजिस्ट्रारसाहेब यांचेकडे पाठवावी. (नमुना पुरवणी नं. २).

(३) मे. रजिस्ट्रारसाहेब यांचेकडे ठरावाची नकल पाठवावयाची तिच्या सोबत (१) सध्याचे पोटनियमांचा मसुदा, (२) दुरुस्त करावयाचे पोटनियमांचा मसुदा व (३) दुरुस्ती करण्याचीं कारणें ही माहिती दाखविणारा तक्ता सोबत जोडावा. जर चालू असलेले सर्वच्या सर्व पोटनियम बदलून त्यांचे ऐवजीं सोसायटीनें सुधारलेले नवीन पोटनियम स्वीकारले असतील तर जुन्या व नवीन पोटनियमांत कोण्या जागेंत भरली जाणारी माहिती, आकडे वगैरे यांत काय फरक केला आहे तो दर्शविला असतां पुरें होईल. (नमुना पुरवणी नं. ३)

(४) दुरुस्ती मंजूर झाल्यावर दुरुस्त पोटनियम जे होतील त्यांच्या चार प्रती ठरावाचे नकलेसोबत जोडाव्या. सोसायटीचे मूळचे पोटनियम ज्या भाषेंत असतील त्याच भाषेंत हे दुरुस्त होणारे पोटनियम लिहिलेले असावे. (नमुना पुरवणी नं. ४).

(५) पोटनियमांत जी दुरुस्ती करावयाची ती योग्य, अवश्य व इष्ट आहे किंवा नाहीं हें मे. रजिस्ट्रारसाहेबांना ठरवितां यावें म्हणून सोसायटीच्या ज्या साधारणसभेंत पोटनियम-दुरुस्तीचे ठराव मंजूर झाले असतील त्या सभेच्या तारखेची सोसायटीसंबंधीं कांहीं अधिक माहिती पुरवावी. (नमुना पुरवणी नं. ५)

(६) वरील १ ते ५ नंबरच्या पुरवण्या शाईनें लिहिलेल्या, टाईप केलेल्या किंवा छापलेल्या असाव्या. पुरवणी नं. ४ च्या चारहि प्रती स्वतंत्र फूलस्कॅप सबंध कागदावर निदान ⅓ मार्जीन सोडून शाईनें लिहिलेल्या, टाईप केलेल्या किंवा छापलेल्या असाव्या, त्यांवर चेअरमन, कमिटीचे आणखी एक सभासद व सेक्रेटरी यांनीं सह्या केलेल्या असाव्या, व त्यांवर सोसायटीचे नांवाचा शिक्का मारलेला असावा. साधारणसभेच्या ठरावाची नकल व उपरिनिर्दिष्ट पुरवण्या हे सर्व कागद रिपोर्टसह ज्या त्या भागाचे मे. असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब, यांचे मार्फत मे. रजिस्ट्रारसाहेब यांचेकडे पाठवावे. (पुरवणी 'अ' मधील नमुना)

एम्. डी. भनसाळी,
रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज्.

* पुरवणी 'अ' आणि वरील १ ते ५ नंबरचे नमुने हस्तपत्रकाबरोबरच सोसायट्यांना वाटले आहेत.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

**पैसे कोणास द्यावे ?—बँक ऑफ फ्रान्सला पडलेला पेंच**

बँक ऑफ स्पेनचे कांहीं पैसे बँक ऑफ फ्रॉन्सकडे पडले आहेत, परंतु स्पेनमध्यें दोन राजकीय पक्ष सत्ता गाजवीत असल्यामुळे युद्धसमाप्तीनंतर ते पुन्हां द्यावें लागण्याची भीति बँक ऑफ फ्रॉन्सला वाटत आहे. आजपर्यंत बार्सिलोनाच्या सरकारशीं तिनें व्यवहार केला आहे, पण फ्रँको शेवटीं विजयी झाल्यास तो पैसे मागेल अशी भीति तिला पडली आहे. तिच्याकडून घेतलेल्या कर्जास तारण म्हणून बँक ऑफ स्पेननें कांहीं सोनें बँक ऑफ फ्रान्सकडे ठेवलें होतें. फ्रँक चलनाची किंमत उतरली असतां ह्या कर्जाची फेड करण्यांत आली तेव्हां आपलें सोनें परत मिळावें म्हणून बार्सिलोना येथील बँक ऑफ स्पेनच्या मुख्य कचेरीनें मागणी केली. स्पेनमध्यें यादवी चालू झाली तेव्हां बूर्गॉस येथें " दुसरी" बँक ऑफ स्पेन स्थापण्यांत आली. आतांपर्यंत बँक ऑफ फ्रान्सनें बार्सिलोना येथील बँकेचा पैसे घेण्याचा हक्क अमान्य केला नव्हता. तथापि, अलीकडे बार्सिलोना विरुद्ध बूर्गॉस असा तंटा फ्रेंच न्यायमंदिरांत प्रविष्ट झाला आहे. त्याचा निकाल कसाहि लागला तरी अखेर पैशाची भरपाई आपणांस दोनदां करावी लागूं नये अशी बँक ऑफ फ्रान्सची स्वाभाविक इच्छा आहे.

---

**डेक्कन मर्चंट्स असोसिएशन**

( २१७, चर्नी रोड, मुंबई नं. ४. )

डेक्कन मर्चंट्स असोसिएशन ह्या संस्थेनें मुंबई शहरांतील दक्षिणी व्यापाऱ्यांच्या औद्योगिक परिस्थितीचें निरीक्षण करण्याचें ठरविलें आहे.त्याकरितां माहिती भरण्याचा तक्ता तयार करण्यांत आला आहे, तो भरून द्यावा अशी सेक्रेटरीज् श्री. माधवराव गोडबोले व श्री. गणपतराव जोशी यांची विनंति आहे. ही संस्था गेलीं २४ वर्षें दक्षिणी व्यापाऱ्यांच्या हितासाठीं झटत आहे. संस्थेनें दक्षिणी लोकांसाठी एक कोऑपरेटिव्ह बँक काढून गेलीं आठ वर्षें ती व्यवस्थित व यशस्वी रीतीनें चालविली आहे. तिचा लाभ पुष्कळ दक्षिणी व्यापारी घेत आहेत. संस्थेजवळ टिळक टेक्निकल लायब्ररी असून निरनिराळ्या धंद्यांमधील लोकांनीं तिचा फायदा घेतला आहे. संस्थेनें दोन क्लासिफाइड ट्रेड्स एक्झिबिशन्स भरवून स्वदेशी व्यापाराला चालना दिलेली आहे. प्रस्तुत असोसिएशननें सध्या मुंबईतील दक्षिणी व्यापाऱ्यांच्या औद्योगिक व आर्थिक परिस्थितीचें निरीक्षण करण्याचें योजिलें आहे. सदर माहिती गोळा करण्याचा उद्देश दक्षिणी व्यापारी वर्ग अधिक सुसंघटित करण्याचा आहे. माहिती घेऊं इच्छिणारांनीं सेक्रेटरी यांस समक्ष भेटावें अशी विनंति आहे.

---

**बँकांच्या सुट्या**

देशांतील बँकांच्या सुट्या ह्या राष्ट्रीय औद्योगिक प्रगतीचें लक्षण मानण्यास हरकत नाहीं; कारण, उद्योगधंदे जोरांत चालू असले, म्हणजे बँका बंद राहून भागत नाहीं. कांहीं प्रमुख देशांतील बँकांच्या सुट्टीचे वर्षांतील एकूण दिवस खालीं दिले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| युगोस्लाव्हिया | ४० | पोलंड | ३४ |
| हिंदुस्थान | २४ | स्वित्झरलंड | १६ |
| क्वीन्सलंड | १५ | फ्रान्स | १४ |
| इटली | १४ | जर्मनी | १२ |
| ग्रेट ब्रिटन | ६ | स्कॉटलंड | ४ |

**रविवारची सुट्टी वगळली असतां, वर्षांतून केवळ सहाच दिवस ब्रिटिश बँका बंद रहातात. हिंदुस्थानांतील बँकांस सुटीचे चोवीस दिवस आहेत.**

**K. K. & Co.**
**Photographic Dealers**
**POONA.**

**'अर्थ' ग्रन्थमाला**
१ बँक आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**दि गुड-वुइल**
**ॲशुअरन्स कंपनी लि.**
**पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल**
**विमेदारास**
भरपूर सवलती माफक हप्ते
ठिकठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.
पत्रव्यवहार करावा.
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा,
मॅनेजिंग डायरेक्टर




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )**
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | ११८—२ |
| ५% (१९३९–४४) लोन ... ... ... | १०३—७ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८–१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९९–२½ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०६—६ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | १००—५ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत) ... | १११—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०९–१२ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉड (७० वर्षे मुदत) | १०९–१२ |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... ... | ११२—४ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२४—४ |

### मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४१–१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११३—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ... | ३१—० |
| इंपीरिअल बँक (५००) १२% ... ... | १५५३–१२ |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) ६% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | ११६–१२ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा–जामनेर (१००) ४½% ... ... | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९८५—० |
| तापी व्हॅली (५००) ७½% ... ... ... | ७४२—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% ... ... | १२०—० |
| कराची (१००) ९% ... ... ... | २१०—० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | १९६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १४२०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १५०५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. ... ... ... | १६२—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ४०—४ |
| शिंदिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | २०—४ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ... | ४८—० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ४३८०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २१०–१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. (२००) १५ रु. २ आ. ... | १५३–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १० रु. ... ... | २४६—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | ११३५—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३५–१०–० |
| चांदी (मिंट) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५०–७–४ |




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग
कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट–सचित्र–सुबोध–माहितीपूर्ण
संगीत–मार्गदर्शक
मालेचीं पुस्तकें.
गायन — किं. ६ आ. | हार्मोनियम — किं. २॥ रु. | दिलरुबा — किं. १ रु. २ आ. | फिडल् — किं. १ रु. ४ आ.
व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा
मोती चौक : : : सातारा

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोप्लाक प्रिंटिंग, सर्डीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

'अभिनंदनीय प्रगति' असेंच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत मांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें मांडवल ५,००,०००

खपलेलें मांडवल २,३४,४५० वसूल झालेलें मांडवल १,१७,१६५

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

अप-टु-डेट शिलाई करतां

## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. — [ खादी भांडाराचे माडीवर

## पराडकर टेलर्स अॅकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

दे. भ. लोकनायक माधव श्रीहरी अणे व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरतां महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोमांतक प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

## दि ग्रेट सोशल लाइफ अॅन्ड जनरल अॅशुअरन्स कं. लि.

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा — चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, गणपती चौक, पुणें २

INDUSTRIAL SOCIETY

## WORK SHOP

Furniture on Hire on Reasonable Terms

Any kind of plain or fancy Wooden and Iron Furniture can be made to order and delivered in the shortest possible time.

Old Furniture also can be bought or sold on commission.

SHEVAK BROS — 1 3 Kasba, POONA Ne r Ganpati Temple

Branch No. 1—Fergusson Road.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult

## V. G. & Sons

ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन यांनी छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.